मराठी साहित्य मंडळ, कलबुरगी (गुलबर्गा)
या संस्थेचे त्रैमासिक

# भाव अनुबंध

Scanned with OKEN Scanner

मराठी साहित्य मंडळ, गुलबर्गा
या संस्थेचे त्रैमासिक

# भाव अनुबंध

वर्ष : ८ अंक : ४

आषाढ, श्रावण, भाद्रपद शके १९४४
जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर २०२२

---

मानद संपादक : **श्री. पवनकुमार देशपांडे**
कार्यकारी संपादक : **श्री. सर्वोत्तम सताळकर**
निवास (०८४७२) २५५८७८ / ०९२४२१९३७९२

संपादक मंडळ

**श्री. विद्याधर मुरुगकर ★ श्री. व्यंकटेश वळसंगकर**
**सौ. वंदना किणीकर ★ सौ. शीतल देऊळगावकर**
**डॉ. योगेश्वर देशपांडे**

---

**संस्थेचा पत्ता : मराठी साहित्य मंडळ**, स्टेशन बाजार,
गुलबर्गा (कलबुर्गी) ५८५१०२.
दूरभाष : कार्या. (०८४७२) २३२२०७ email-s.satalkar@yahoo.com
वेळ : सकाळी ८ ते ११ व सायं. ५ ते ८. गुरुवारी साप्ताहिक सुट्टी.

---

या अंकाचे मूल्य : रु. ५०/-
वार्षिक वर्गणी - वैयक्तिक रु. ३००/-, संस्थेसाठी रु. ४००/-
वर्गणी कुठल्याही महिन्यापासून चेक, डीडी अथवा मनीऑर्डरच्या माध्यमाने
'Editor Anubandh' या नावाने पाठवावी.

(संपादकीय व व्यवस्थापकीय पत्रव्यवहार, अभिप्रायार्थ भेट पुस्तके, नियतकालिके, प्रसिद्धीसाठी साहित्य इ. कार्यकारी संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावे. प्रसिद्धीसाठी साहित्य ईमेल वरही पाठविता येईल. या अंकातील लेखांत व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# अंतरंग.....


- संपादकीय..... ३
- काळेकरडे स्ट्रोक्स : एक उदास पोकळी / डॉ. सुधीर ब. मोरे ६
- गुजराती दलित कथाकार प्रवीण गढवी यांच्या कथेतील जीवन संघर्ष / अमोल सुभाष कवडे १५
- कृष्णात खोतांची कादंबरी / डॉ. वैशाली श्रीकृष्ण भालसिंग २१
- राहीच्या स्वप्नांचा उलगडा / डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात ४०
- दोष ना कुणाचा ! (कथा) / राधिका शाम घोगले ४६
- संत कान्होपात्रा : जीवन चरित्र / गौरी सकुंडे ५२
- श्री चारधाम यात्रा / अनुप्रिता सताळकर ५९
- म. फुले यांच्या काव्यातील शैक्षणिक विचार / दत्ता सरगर ६८
- युगान्त - एक अलौकिक पुस्तक / हरी अग्निहोत्री ७४
- कविता.... कविता.... कविता.... कविला.... ७६
- 'चित्रब्रम्ह' पुटण्णा कणगल / सर्वोत्तम सताळकर ७९
- कैलास लेण्यातील कथापर शिल्पपट / डॉ. चैतन्य शिनखेडे ८६
- मंडळाची वाटचाल..... ९४


Scanned with OKEN Scanner

# राहीच्या स्वप्नांचा उलगडा

● डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात

## प्रस्तावना

उदगीर येथे होणाऱ्या ९५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष भारत सासणे हे मराठी साहित्यविश्वात कथाकार म्हणून प्रसिद्ध आहेत. मराठी नवकथेच्या वैशिष्ट्यांना आत्मसात करून १९८० नंतरच्या आधुनिक मराठी कथाकारांमध्ये भारत सासणे हे अग्रगण्य व महत्त्वाचे कथालेखक आहेत. खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाच्या उंबरठ्यावर जग उभे असताना कथालेखनामध्ये मुशाफिरी करणारे सासणे आपल्या कथेतून ग्रामीण, आदिवासी व नागर समाजाचे यथासांग वर्णन करतात. त्यांची प्रत्येक कथा दीर्घत्वाकडे झुकणारी आहे. त्यांच्या लेखणीमुळे दीर्घकथांचा एक प्रवाह मराठी साहित्यात प्रवाही होताना दिसतो. गूढरम्यता, मानवी नात्याची गुंतागुंत, अनाकलनीय व अतर्क्य मानवी जीवन अशा अगम्य डोहामध्ये वाचकांना घेऊन जाण्याचे काम सासणे करतात. वाचकांना अशा डोहातून बाहेर येताना अनाकलनीय अशा अनेक गोष्टींची उकल त्यांच्या कथानकातून होते.

मराठी कथा, नाटक, बालवाङ्मय, कादंबरी असे वाङ्मय प्रकार हाताळणारे सासणे आपल्या साहित्यातून वाचकांना एखाद्या जुन्याच प्रश्नावर नव्याने विचार करायला प्रवृत्त करतात. त्यांच्या 'राहीच्या स्वप्नांचा उलगडा' या कादंबरीच्या अनुषंगाने परीक्षणात्मक विचार येथे करावयाचा आहे.

## राहीच्या स्वप्नांचा उलगडा

*अहल्या, द्रौपदी, सीता, तारा, मंदोदरी तथा*
*पंचकन्या स्मरे नित्यम् महापातक नाशनाम्*

असा एका बाजूला स्त्री जातीचा गौरव करणारे आपण, दुसऱ्या बाजूने 'न स्त्री स्वातंत्र्यं अर्हती' असे जना-मनात जणू काही रुजवलेले आहे. पुरुषप्रधान

संस्कृतीच्या मानसिकतेत वावरणारा समाज स्त्रीही एक माणूसच आहे हे मानायला तयार होत नाही असे दिसते. तिला सतत बंधनात, दडपणाखाली ठेवण्याची मानसिकताच जास्त दिसून येते. हुंडाबळी, स्त्री-भृणहत्या, बालविवाह, सासुरवास या साऱ्या समस्या याच पगड्यातून निर्माण झाल्या आहेत. तिलाही आशा, आकांक्षा, स्वप्ने असू शकतात, हेच समाजाला मान्य होताना दिसत नाही. अशा पुरुषी संस्कृतीला खतपाणी घालण्याचे काम काही स्त्रियाही करताना दिसतात. सदर लेखाच्या माध्यमातून भारत सासणे यांच्या 'राहीच्या स्वप्नांचा उलगडा' या कादंबरीच्या नायिकेच्या स्वप्नांचा उलगडा करण्याचा प्रयत्न केला आहे.

या कादंबरीच्या शीर्षकापासून एका अनाकलनीय गूढतेला सुरुवात होते. कादंबरीची नायिका 'राही' वाड्यामध्ये येण्याअगोदरच तिच्या येण्याची चर्चा सुरू होते व ती तिथून निघून जाते तिथे कादंबरी समाप्त होते. मधल्या काळात जे जे घडते ते सगळे संकेताच्या माध्यमातून लेखक मांडतो. कादंबरीचे प्रमुख पात्र असणारी 'राही' हे नाव शाहिरांनी आपल्या लावण्यांतून कृष्णाची सखी असणाऱ्या राधेला वापरल्याचे दिसून येते. त्या 'राहीचे' प्रेम जसे गूढ व अगम्य आहे तसेच या राहीच्या बाबतीतही घडताना दिसते. तिचे प्रेम, तिचे विचार, तिचे संवाद आणि तिला पडणारी स्वप्ने वाचकांना तर्काच्या पातळीवर अर्थबोध करून घ्यावी लागतात.

'स्वप्ने सत्यात उतरतात, पण ती उतरावीही लागतात' या राहीने वाचलेल्या वाक्याने कादंबरीला सुरवात होते. तिच्या म्हणण्याप्रमाणे तिला व प्रत्येक माणसाला पडणारी स्वप्नं प्रथम मन:पटलावर उमटतात आणि मग ती सत्यात उतरविण्यासाठी प्रत्येकजण धडपडत असतो. राही तिची आई व तिचे वडील भाऊसाहेब यांच्याबरोबर वाड्याबाहेर पडलेली असते. ते नक्की कोणत्या कारणाने वाड्याबाहेर पडले हे शोधण्यासाठी तरुण राही पुन्हा त्या घरात येते. आता तिचे वडील हयात नसल्याने तिचे काका बाळासाहेब व काकी आणि घरातील दस्तऐवजाच्या माध्यमातून व तिला पडणाऱ्या स्वप्नांच्या माध्यमातून ती सुतावरून स्वर्ग गाठण्याचा प्रयत्न करते. नुकत्याच तारुण्यात पदार्पण केलेल्या राहीने पुन्हा येण्यामागे काका, काकीना इस्टेटीचा लोभ हे कारण असावे असे वाटते. राहीला कशाचा लोभ नाही. फक्त आपल्या आईवडिलांनी वाडा का सोडला ? याची उकल करण्यासाठी ती धडपडत आहे.

स्त्री मग ती कोणत्याही धर्मातील असो, तिच्यावर बंधनाचे पर्वत लादलेले असतात, हे सत्य आपण नाकारू शकत नाही. मुस्लिमांची हिजाब, हिंदूंची गोषा पद्धत, उत्तरभारतातील 'घुंगट' घेण्याची पद्धत स्त्रीला बंधनातच टाकताना दिसते. आपल्या महाराष्ट्रातही तालेवार घराण्यांमध्ये तिला मनमोकळेपणे बाहेर जाण्याची मुभा दिसत नाही. कादंबरीच्या मलपृष्ठावर म्हटले आहे, 'वतनदार घराण्यातल्या एकाकी संवेदनशील स्त्रीच्या आंतरिक संघर्षाची कथा 'राहीच्या स्वप्नांचा उलगडा'मध्ये स्वप्नसदृश वास्तवाच्या भासातून तर कधी वास्तवसदृश स्वप्नानुभावातून उघडत जाते.' या मताचा विचार केल्यास स्वप्न आणि वास्तव यांची सांगड घालून स्त्रीचे अपार दु:ख सासणे दाखविण्याचा प्रयत्न करतात. राही वाड्याकडे येतानाचे वर्णन करताना म्हणते, 'मला स्वप्नासारखं वाटलं .... स्वप्न ! वास्तव असं वाटलंच नाही ! किती धुकं ! सुंदर आणि गूढ ! आणि माणसंच नाहीत फारशी. मी एकटीच टांग्यातून येतेय ! इकडे हवेलीकडे ! स्वप्नच !' (पृ. क्र. २३) तिच्या मनाच्या स्थितीचे वर्णन करताना लेखक म्हणतात, ' काही पावलांचे आवाजही ऐकू येताहेत. कुठंतरी घरातच कुणीतरी जिन्यावर आहे किंवा कुणीतरी जिना उतरत आहे किंवा खाली कुठंतरी, कुणीतरी चालतंय, काही पदाघात करतंय किंवा दूरवरची काही कुजबुज...' (पृ. क्र. २७) तर डॉक्टरांशी बोलताना राही म्हणते, ' हातात टॉर्च नंतर ते विवर. त्याला पायऱ्या. आपण उतरतो आहोत. अंधार आहे .(हाही स्वप्नात दिसतो.) तिथं खाली काहीतरी आहे. म्हणजे संकट एखादं. पुन्हा पुन्हा हेच स्वप्न. वेगवेगळ्या पद्धतीने सुरू होणारं आणि इथं येऊन संपणारं. शोध आणि विवर हे कॉमन आहे सगळ्या स्वप्नात. काय आहे याचा अर्थ ?'( पृ. क्र. ३३) अशा अनेक स्वप्नांचा अन्वयार्थ लावण्याचा ती प्रयत्न करते. ज्या वाटेने तिचे आईवडील गेले त्याच वाटेने ती हवेलीतून बाहेर पडते. इतके दिवस बंद असणारा दरवाजा उघडण्यात ती यशस्वी ठरते. त्या वाड्यात बाळासाहेबांच्या पत्नीच्या पोटी मुलगा जन्माला येतो. राही सर्वांचा निरोप घेताना ते नवजात बालकही हुंकार देते. लेखक म्हणतात, 'ती फुलातून चालत राहिली, शांत मनानं उतरत राहिली पायऱ्या. एक शोध संपला. एक प्रवास थांबला...... आता बहुदा तशी स्वप्ने पडणार नाहीत, अंधाराची भीती वाटणार नाही. आणि हो, ते निळं वस्त्र घेतलं आहे ना आठवणीनं !' (पृ. क्र. १३१)

राहीच्या स्वप्नांचा उलगडा सहजासहजी वाचकांनाही होत नाही. कारण

या कादंबरीत वापरलेले संकेत आणि नायिकेची स्वप्ने यांची सांगड घालताना वाचकांची दमछाक होते. दिवाणखान्यातील रानगव्याचे मस्तक, भिंतीवरील हिरव्या पोपटांचे पारंपरिक भित्तीचित्र, कबुतरांचे फडफडणे, झुंबरातून गाळून उतरणारा मंद प्रकाश, धुकं पडणं, पाव्याचा स्वर, तळघर हे सारे संकेत वापरून लेखकाने स्त्रियांच्या दुःखाला वाचा फोडली आहे. राहीचे वडील भाऊसाहेब यांच्यावर दोन आरोप आहेत, एक म्हणजे त्यांनी वडिलोपार्जित जमिनीचा गैरव्यवहार केला व दुसरा म्हणजे त्यांनी हलक्या जातीच्या बाईशी लग्न व्यवहार करून व संकर करून सामाजिक आणि जातीय गुन्हा केला. ह्या दोन आरोपांचा निवाडा रानगव्याच्या साक्षीने होतो. रानगवा वास्तव मांडताना म्हणतो, 'माणसाला सगळे काही शोधावं लागतं : भाकरी, नोकरी; पण तो स्वतःला मात्र शोधू शकत नाही.' (पृ. क्र. ९५) रानगव्याच्या तोंडी हे वाक्य देऊन लेखकाने माणसाविषयीची निसर्गातील इतर घटकांची भावनाच व्यक्त केलेली आहे.

स्वप्नांचा उलगडा करताना लेखकाने मुखवट्यांचाही वापर केला आहे. मुखवटे घुबडासारखे किंवा पेंग्विन पक्षासारखे जांभळे-काळे. या मुखवट्यांच्या साहाय्याने दोन नाट्यप्रवेशही कथानकात घेतले आहेत. त्याचे कारण म्हणजे बाळासाहेबांचे पिताजी नाटकाचे शौकीन होते. नाटककारांच्या कष्टांविषयी लेखक म्हणतात 'नाटककार शाईत रक्त मिसळतो! अश्रू मिसळतो! याचं सर्वस्व पणाला लागतं.' (पृ. क्र. २०) तर दुसऱ्या बाजूला समकालीन इतिहासपुरुष महात्मा गांधी व विनोबा भावे हेही कथानकात डोकावून जातात. इथे गांधींना विष्णूचा अवतार मानलेय तर विनोबांची भूदान चळवळ आवडली नसल्याचे आईसाहेब म्हणतात. तसेच बुद्धिबळाच्या खेळातूनही लेखक संदेश देण्याचा प्रयत्न करतात. 'झुंबरातून गाळून उतरणारा मऊ मंद प्रकाश बुद्धिबळाच्या पटावर पसरून राहिला. वर छताकडच्या पोकळीत आता चंदेरी प्रकाश नाही. आता तिथं फिकट गुलाबी प्रकाश आहे. तसा तो परावर्तित होऊन जिन्यातही विखुरलाय. पायऱ्यांवर. कठड्यावर. रानगव्याच्या मस्तकावर.' (पृ. क्र. ६१) अशा अनेक अगम्य संकेतांचा वापर कादंबरीच्या पानोपानी येतो.

## सारांश

राहीच्या स्वप्नांचा उलगडा करताना माझ्यामते कादंबरीतील आईसाहेब हे पात्र खूप महत्त्वाचे आहे. राही ही त्यांच्या भाऊसाहेब या सावत्र मुलाची मुलगी



Scanned with OKEN Scanner

आहे. आईसाहेबांना तारुण्याचे आकर्षण आहे. उदा. 'आईसाहेबांचे केस अस्ताव्यस्त झाले. राहीनं त्यांना टेकवून बसवलं. गळ्यापर्यंत चादर ओढली. नंतर त्या लुकलुकणाऱ्या डोळ्यांनी पाहत राहिल्या तिला. जणू त्या तिचं तारुण्य पिऊन घेतायत.' (पृ. क्र. ४५) भाऊसाहेब हलक्या जातीच्या बाईशी लग्न करतात हे तिला न रूचणारे आहे. त्यांची वाड्यातील सर्वांच्यावर जरब आहे. फुक्या प्रतिष्ठेमुळे ती लेक-सुनेला घराबाहेर काढते. राहीने आपल्या आईकडून अनुवांशिकपणे हे दडपण घेतले असावे म्हणून तिला वेगवेगळी स्वप्ने पडतात. वृध्दापकाळाने जर्जर झालेल्या आईसाहेब राहीला म्हणतात, 'तसं पाहिलं तर सगळा कैदखानाच असतो ना ? ...आत्माराम या शरीरात कैद, श्वास छातीत कैद ! पण मला जगायचंय. जगायचंय !' (पृ. क्र. ४५) बाळासाहेबाची बायको त्यांच्यासमोर 'ब्र' शब्दही उच्चारत नाही. असा दडपणाखाली वावरणारा वाडा राहीच्या येण्याने 'मोकळा श्वास' घेतो. राहीच्या मनाची तगमग लेखकाने कबुतरांच्या पंखांच्या फडफडीतून दाखवली आहे. वतनदार घरातील स्त्रिया त्यांच्या सुनांना दडपणात ठेवतात. प्रत्येक गोष्टीचा अन्वयार्थ लावण्याचा आईसाहेब प्रयत्न करतात. त्यांची जमीन भूदान चळवळीत गेली असावी म्हणून त्यांना विनोबांची ही चळवळ मान्य नाही. राहीचे पुन्हा वाड्यात येणेही त्यांना अमान्यच दिसते. परंपरेचा पगडा असणाऱ्या आईसाहेब नव्या गोष्टी स्वीकारत नाहीत. पिढ्यानूपिढ्या ज्या दडपणाखाली आपण वावरलो त्याच दडपणाखाली त्या सर्वांना ठेवण्याचा प्रयत्न करतात. पण राही नवविचारांची, नवशिक्षित तरुणी आहे, ती हे दडपण झुगारून टाकते, बाळासाहेबांचा नुकताच जन्मलेला मुलगा तिच्याकडे बघून हसतो हा राहीच्या संघर्षाला नव्या पिढीची साथ असल्याचा संकेतच आहे, असे मला वाटते.

**समारोप**

सासणे यांची ही कादंबरी तर्कशास्त्र आणि मनोविश्लेषणात्मक पद्धतीने अभ्यासणे गरजेचे वाटते. मी माझ्या तर्काच्या पातळीवर कादंबरीचा उलगडा करण्याचा प्रयत्न केला आहे. या कादंबरीच्या अर्पणपत्रिकेत स्वत: लेखकानेच म्हटलेले आहे, 'श्रीनिवास विनायक कुलकर्णी यांना, आणि या कादंबरीत काहीतरी वेगळे आहे, पण शोधावे लागते असे ज्यांनी कळविले, आणि ज्यांनी नाही कळविले, त्या मित्रांना.'



Scanned with OKEN Scanner

सदर कादंबरीत मलातरी दडपणाखाली वावरलेल्या एका आईसाहेब नावाच्या स्त्रीने इतरांनाही स्वतःच्या प्रभावाखाली ठेवल्याचा प्रयत्न केल्याचे दिसते.

'राहीच्या स्वप्नांचा उलगडा'
- भारत सासणे
पहिली आवृत्ती : १५ मे २००२
मौज प्रकाशन गृह, मुंबई.

**- डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
किसन वीर महाविद्यालय, वाई.
मोबा. : ९६०४०४६०८४
Email : sangramthorat750@gmail.com

★ ★ ★

## लेखकांसाठी सूचना

१. कृपया लेखन शक्यतो संशोधनात्मक, साहित्यिक अथवा ललित विषयावरच असावे.
२. लेखन पानाच्या एका बाजूला व्यवस्थित समास सोडून असावे.
३. दुसरीकडे पाठवलेले आणि प्रकाशनाच्या प्रतिक्षेत असलेले साहित्य पाठवू नये.
४. काही लेखक एकच साहित्य अनेक प्रकाशनाकडे पाठवतात, अशा प्रकारचे साहित्य पाठवू नये.
५. नवीन कादंबरी, कथासंग्रह, काव्यसंग्रह यांच्यावर परीक्षणात्मक लेख असतील तर बरोबर मूळ पुस्तकही पाठवावे. अन्यथा अशा लेखनाचा विचार केला जाणार नाही.
६. लेखन सुवाच्च अक्षरात असावे. टंकलिखित असल्यास जास्त चांगले.
७. संशोधनपर लेखाबरोबर योग्य ते संदर्भ जोडावेत.
८. लेखनाच्या शेवटी पत्ता आणि मोबाईल क्रमांक द्यावा.
९. लेखन पाठवताना पानाची मर्यादा ध्यानात ठेवावी. फार प्रदीर्घ लेख घेता येणार नाहीत.

**- कार्यकारी संपादक**



Scanned with OKEN Scanner